
ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189



सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक ३१० • बुधवार दि.९ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.


# शासन-जरांगे कठोर ;आंदोलक आक्रमक




## मराठवाड्यात काही ठिकाणी हिंसक आंदोलन

मुंबई/प्रतिनिधी-मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाचा बुधवारी बारावा दिवस आहे. सरकारकडून मागण्यांवर कार्यवाही सुरू असल्याचा दावा केला जात असला, तरी ठोस निर्णय होत नसल्याने मराठा समाजातील असंतोष वाढत आहे. राज्यातील विविध भागांत आंदोलने तीव्र होत असून काही ठिकाणी आंदोलनाला आक्रमक वळण मिळाले आहे.

जालना जिल्ह्यात आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने खबरदारी घेत गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ९ व १० सप्टेंबर रोजी मद्यविक्री बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या दोन दिवसांना कोरडा दिवस घोषित करण्यात आला आहे. अंतरवाली सराटी येथे मोठ्या संख्येने आंदोलक जमा होण्याची शक्यता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला.बीड जिल्ह्यातील वडवणी येथे सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत बीड-परळी महामार्ग रोखून धरला. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली.धाराशिव जिल्ह्यातील उमरगा येथे मात्र आंदोलनाला अधिक आक्रमक वळण मिळाले. काही आंदोलकांनी तहसीलदार कार्यालयात प्रवेश करून तहसीलदारांची खुर्ची बाहेर आणली आणि पेटवून दिली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. आंदोलकांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी केली.दरम्यान, सरकारने कुणबी नोंदी शोधण्याची प्रक्रिया सुरू केली असून आतापर्यंत सुमारे साडेतीन ते पावणेचार लाख नागरिकांनी कुणबी प्रमाणपत्रे घेतल्याचा दावा मंत्री शंभूराज देसाई यांनी केला आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी विविध योजना, शिष्यवृत्ती तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची वाढीव तरतूद याबाबत सरकारने कार्यवाही केल्याचे त्यांनी सांगितले.

**शिंदेंवरील एकेरी टीका थांबवा**

मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या एकेरी टीकेवरून शिवसेनेच्या मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मंत्री शंभूराज देसाई यांनी जरांगेंना एकनाथ शिंदे यांच्यावरील एकेरी टीका थांबविण्याचे आवाहन केले. मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला राजकीय संघर्षाचे स्वरूप येऊ नये, अशी सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सरकारच्या म्हणण्यानुसार मागण्यांवर कार्यवाही सुरू असतानाही आंदोलन मागे न घेतल्याने दोन्ही बाजूंमधील संघर्ष वाढताना दिसत आहे. दुसरीकडे, आरक्षणाच्या मागणीवर तातडीने निर्णय घ्यावा, या मागणीवर आंदोलक ठाम आहेत. त्यामुळे आगामी काळात मराठा आंदोलनाची दिशा काय राहणार आणि सरकार त्यावर कोणता तोडगा काढणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे

### मृत आंदोलकांच्या वारसांना नोकरीसाठी छत्रपती संभाजीनगर येथे विशेष कॅम्प

मुंबई/प्रतिनिधी-मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या आंदोलकांच्या पात्र वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याच्या प्रक्रियेला राज्य सरकारने वेग दिला आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) नोकरी देण्यासाठी प्रलंबित अर्जांची छानननी करून ते लवकर मार्गी लावण्यात येणार आहेत.

या अर्जांची तपासणी करण्यासाठी प्रादेशिक व्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली विशेष नियंत्रण समिती नियुक्त करण्यात आली आहे. समितीकडून अर्जांसह जोडलेल्या कागदपत्रांची छानननी केली जाणार आहे. दरम्यान, संबंधित दिवंगत आंदोलकांच्या पात्र वारसांनी ११ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित विशेष कॅम्पमध्ये मूळ कागदपत्रे व आवश्यक प्रमाणीकृत प्रतींसह उपस्थित राहावे, असे शासनाकडून कळविण्यात आले आहे. सरकारच्या या निर्णयामुळे रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्या बाधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

## संभाजीनगरातून दंगल घडविण्याचे षडयंत्र;जरांगे पाटलांचा गंभीर आरोप



अंतरवली सराटी:छत्रपती संभाजीनगरात बसून मराठा समाजात मारामाऱ्या आणि दंगल घडविण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचा खळबळजनक आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला. या आंदोलनादरम्यान दंगल घडल्यास त्याला एकनाथ शिंदे हेच जबाबदार असतील, असा थेट इशाराही त्यांनी दिला. अंतरवली सराटी येथे माध्यमांशी संवाद साधताना जरांगे पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली.

सरकारमधील सर्व मंत्री एकत्र आले, तरी मराठा समाजाचे काहीही वाकडे करू शकत नाहीत. आमदार-मंत्र्यांकडे पैसा आणि गुंडांची फौज असेल, असे तुम्हाला वाटत असेल; मात्र एकत्र येऊन मराठ्यांना दाबण्याचा प्रयत्न केला तरी ते शक्य होणार नाही, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.उद्योगमंत्री उदय सामंत यांनी जरांगे पाटील हे आजूबाजूच्या लोकांचे ऐकून वागत असल्याचा आरोप केला होता. त्यावर पलटवार करताना जरांगे म्हणाले की, आमच्या आजूबाजूला कोण आहे, याचे आरोप यापूर्वीही झाले आहेत. मग आम्ही आतापर्यंत चांगले होतो का? आमच्यासोबत चहा घेताना सर्व काही चांगले वाटत होते का? आता मात्र मराठा समाजाला संपविण्याची भूमिका घेतली जात आहे, असा आरोप त्यांनी केला.

**संभाजीनगरात येऊन षडयंत्र**

संभाजीनगरात येऊन आंदोलन मोडीत काढण्यासाठी षडयंत्र केले जात असल्याचा आरोपही जरांगे यांनी केला. सरकार आंदोलन हाताळण्यात अपयशी ठरले असून राजकीय स्टंट केले जात आहेत. फडणवीसांना मराठ्यांना आरक्षण द्यायचे नाही, हे सरकारने स्पष्टपणे सांगावे. सरकार सपशेल हरले आहे, असा दावा त्यांनी केला.

मंत्री शंभुराज देसाई यांनी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत जरांगे यांच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली होती. त्यावर उत्तर देताना जरांगे म्हणाले की, माझे बोलणे तुम्हाला रुचले नसेल; मात्र मराठा समाजाला ते रुचले आहे. मराठ्यांचे नुकसान होत असताना तुम्ही कुठे होता, असा सवाल त्यांनी केला.

## ट्रम्प यांच्या निर्णयाचा आयटी शेअर्सना दणका;५५ हजार कोटींचा चुराडा!

मुंबई/प्रतिनिधी-अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने कॉग्निझंटच्या परदेशी कामगारांसाठीच्या कायमस्वरूपी रोजगार प्रमाणपत्राच्या अर्जांवर स्थगिती दिल्याने भारतीय आयटी शेअर्समध्ये



बुधवारी मोठी घसरण झाली. आयटी निर्देशांक व्यवहारादरम्यान तीन टक्क्यांहून अधिक घसरला. या पडझडीत आघाडीच्या आयटी कंपन्यांचे बाजारमूल्य सुमारे ५५ हजार कोटी रुपयांनी कमी झाले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी रोजगार प्रमाणपत्राच्या अर्जांवर स्थगिती देण्याचा निर्णय जाहीर करताच शेअर्स बाजारात मोठ्या उलथापालथी होण्यास सुरुवात झाली. इन्फोसिसच्या शेअर्समध्ये तीन टक्क्यांहून अधिक, तर टेक महिंद्रा, एचसीएल टेक्नॉलॉजीज आणि पर्सिस्टंट सिस्टीम्समध्ये सुमारे तीन टक्क्यांची घसरण झाली. टीसीएस, विप्रो आणि एलटीआय माइंडट्रीचे शेअर्सही सुमारे दोन टक्क्यांनी घसरले.अमेरिकेच्या कामगार विभागाचे महानिरीक्षक अँथनी डी'एस्पोसिटो यांनी कॉग्निझंटच्या अर्जांवरील स्थगितीची माहिती देताना कथित फसवणूक आणि अमेरिकन कामगारांच्या हिताला होणाऱ्या संभाव्य नुकसानीची चौकशी सुरू असल्याचे सांगितले. प्रक्रिया परदेशी कामगारांना कायमस्वरूपी रोजगार आणि रोजगाराधारित ग्रीन कार्ड मिळवून देण्यासाठी महत्त्वाची असते. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयामुळे भारतीय आयटी कंपन्यांच्या अमेरिकेतील मनुष्यबळ धोरणावर परिणाम होण्याची चिंता वाढली आहे.

## जालन्याचे माजी आ.कैलास गोरंट्याल यांच्या विरुद्ध सख्ख्या भावाची पोलिसांत तक्रार!

### बिडी कारखान्यात घुसून तोडफोड,मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप

नांदेड/प्रतिनिधी-माजी आ.कैलास गोरंट्याल यांच्याविरुद्ध त्यांचेच सख्खे भाऊ गोपाल गोरंट्याल यांनी पोलिसांत तक्रार दाखल केल्याने नांदेडच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. जिंदमवाडी येथील बिडी कारखान्यात जबरदस्तीने प्रवेश करून तोडफोड, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप गोपाल गोरंट्याल यांनी तक्रारीत केला आहे.

गोपाल गोरंट्याल यांच्या मालकीचा बिडी कारखाना जिंदामवाडी येथे गेल्या सुमारे ४० वर्षांपासून सुरू असून, या व्यवसायावर नांदेड शहरातील सुमारे ७५० बिडी कामगार अवलंबून असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

६ सप्टेंबर रोजी दुपारी सुमारे १.३० वाजता माजी आ.कैलास गोरंट्याल यांच्यासह चार जण कारखाना परिसरात आले. कारखान्याच्या जुन्या इमारतीच्या तोडकामावरून व्यवस्थापकाला जाब विचारत कॉलर पकडून धक्काबुक्की, शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

माजी आ.कैलास गोरंट्याल यांच्याविरुद्ध त्यांच्याच सख्ख्या भावाने पोलिसांत तक्रार केल्याने या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. कौटुंबिक वाद आता थेट पोलिसांपर्यंत पोहोचल्याने या प्रकरणाला राजकीय रंगही प्राप्त झाला आहे.

गोपाल गोरंट्याल यांनी संबंधित प्रकाराची चौकशी करून मारहाण, धमकी, जबरदस्तीने प्रवेश आणि तोडफोड करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, तक्रारीतील आरोपांची पोलिसांकडून चौकशी होणे बाकी असून माजी आ. कैलास गोरंट्याल यांची बाजू अद्याप समोर आलेली नाही.

### जेसीबी चालकासही मारहाण केल्याचा आरोप

कारखान्याची सुमारे ७० वर्षे जुनी व जीर्ण इमारत पाडण्याचे काम सुरू असताना संबंधितांनी हस्तक्षेप करून गोंधळ घातल्याचे तक्रारीत म्हटले आहे. यावेळी जेसीबी चालकासही शिवीगाळ करून मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. आपल्या मालकीच्या कारखान्यात कोणताही कायदेशीर अधिकार नसताना जबरदस्तीने प्रवेश करून तोडफोड व मारहाण करण्यात आल्याचा दावा गोपाल गोरंट्याल यांनी केला आहे. या घटनेमुळे कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून बिडी व्यवसायाच्या पुढील कामकाजावर परिणाम होण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली आहे.

## मनोज जरांगेंच्या आंदोलनाला खा.रवींद्र चव्हाण यांचा पाठींबा




नांदेड/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवली सराटी येथे आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांची खा.रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी भेट घेऊन आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शविला. या भेटीत मराठा आरक्षणासह आंदोलनाच्या विविध मागण्यांवर चर्चा करण्यात आली.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची राज्यभरात चर्चा सुरू असताना खा.चव्हाण यांनी अंतरवली सराटी येथे प्रत्यक्ष भेट देत आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी त्यांनी जरांगे पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा केली. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन तोडगा काढण्याची गरज असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले.खा.चव्हाण यांच्या भेटीमुळे आंदोलनाला राजकीय पाठबळ मिळाल्याची चर्चा सुरू झाली आहे. अंतरवली सराटी येथे सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.यावेळी माजी आ.हणमंत पाटील बेटमोगरेकर, विठ्ठल पावडे, महेश देशमुख, सुरेश बर्लीकर, महाजन ढेकळे, गणेश कोकाटे आदी उपस्थित होते.

## रेल्वे मंडळ प्रबंधकांच्या विरोधात एकनाथ ब्राह्मणवाडेकर यांचे १६ रोजी उपोषण

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड तालुक्यातील गाडेगाव येथील रेल्वे अंडरब्रिज व उड्डान पुलाचे काम बंद असल्यामुळे नागरिकांना खड्डेमय रस्त्याने बोंढार हवेली मार्गे ५ किलो मीटरचा पल्ला पार करावा लागत आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून या उड्डान पुलाचे मागील ४ वर्षांपासून संथ कामाच्या विरोधात रेल्वे मंडळ प्रबंधकांच्या विरोधात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पूर्वसंधेपासून एकनाथ बत्तलवाड ब्राह्मणवाडेकर हे जिल्हाधिकारी नांदेड कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार आहेत.

या पुलाचा कालावधी एक वर्षाचा असताना २०२१ मध्ये पुलाचे काम चालू झाले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी १ वर्षासाठी हा रस्ता बंद केला होता, परंतु ४ वर्षे पूर्ण होऊनही या रेल्वे उड्डान पुलाचे काम पूर्ण झाले नाही. या पुलाचे लवकर काम करण्यात यावे, यासाठी ब्राह्मणवाडेकर यांनी अनेकवेळा निवेदने देऊनही प्रशासनाने कोणतीच कार्यवाही केलेली नाही. तसेच नांदेड जिल्ह्यातील तीन खासदार आणि आठ आमदारांचेही लक्ष नसल्याचे दिसून येत आहे. सदरील अंडर ब्रिज रेल्वे विभाग करत आहे. तसेच उड्डान पुलाचे काम श्रीजी कंपनी करीत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे विभाग आणि कंत्राटदार या तिघांची मिलीभगत दिसून येत आहे. या तिघांवरही गुन्हे दाखल करण्यासाठी ब्राह्मणवाडेकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे. या व्यतिरिक्त या रोडवर येणाऱ्या ब्राह्मणवाडा गावामध्ये श्रीजी कंपनीने गावातील अस्वच्छ पाणी गावाबाहेर काढून दिलेले नाही, त्यामुळे लोकांच्या घरात अस्वच्छ



पाणी जात आहे. बंदिस्त नाली बांधकाम करण्याची मागणी निवेदनाद्वारे केलेली आहे. वरील मागण्या त्वरित पूर्ण कराव्यात, अन्यथा दि. १६ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे एकनाथ बत्तलवाड ब्राह्मणवाडेकर यांनी निवेदनाद्वारे कळविले आहे.

## किनवटमध्ये कर्णकर्कश सायलेन्सर वाहनांचा उपद्रव वाढला

किनवट/प्रतिनिधी- किनवट पोलीस स्टेशनच्या हद्दीत सध्या अनधिकृत पोलीस सायरन आणि कर्णकर्कश सायलेन्सर लावलेल्या दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांचा उपद्रव वाढला आहे. या बेकायदेशीर सायरनच्या आवाजामुळे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या सामान्य नागरिकांमध्ये, विशेषतः शाळकरी मुले आणि महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून मोठा अपघात घडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार हे याकडे लक्ष देतील का असा सर्व सामान्यांना पडलेला प्रश्न आहे.

काही हुल्लडबाज वाहनचालक आपल्या खाजगी वाहनांवर अनधिकृतपणे पोलीस सायरन बसवून शहरात मिरवत आहेत. रस्त्याने चालणाऱ्या नागरिकांच्या पाठीमागे अचानकपणे उच्च आवाजाचा सायरन वाजवला जातो, ज्यामुळे नागरिक दचकून पळापळ करतात. शाळकरी विद्यार्थ्यांची आणि महिलांची मोठी तारांबळ उडत आहे. या सायरनच्या आवाजामुळे वाहनचालकांचे नियंत्रण सुटून एखादी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सायरनसोबतच अनेक दुचाकींना नियमबाह्य आणि कर्णकर्कश आवाज करणारे 'मॉडिफाइड' सायलेन्सर लावण्यात आले आहेत. दिवस-रात्र सुरू असलेल्या या आवाजाच्या प्रदूषणामुळे लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. खाजगी वाहनांवर हुद्द्याचा गैरवापर करून किंवा बेकायदेशीरपणे सायरन लावणे हा कायदेशीर अपराध आहे. तरीही किनवट शहरात आणि परिसरात या वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. या त्रासातून सामान्य नागरिकांना मुक्ती देण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम राबवून अशा वाहनांवर आणि चालकांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी किनवट शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# ‘सर्वोच्च’चपराक

**दोन दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने डॉक्टर मारहाण प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान राज्यात कायद्याचे राज्य आहे की नाही?, असा थेट सवाल करून राज्य शासनाला चांगलीच चपराक दिली. न्यायालयाचा हा सवाल केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित नाही. तो राज्यातील कायदा–सुव्यवस्थेच्या एकूणच स्थितीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे. सत्ता कोणाचीही असो, कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे. परंतु अलीकडच्या काळातील काही घटना पाहिल्या तर सत्तेच्या सावलीत कायद्याची धार बोथट होत असल्याचे चित्र दिसते. कायद्याचे राज्य म्हणजे सामान्य माणसासाठी वेगळा आणि सत्तेच्या जवळच्या व्यक्तींसाठी वेगळा न्याय नव्हे. एखाद्या व्यक्तीचा राजकीय प्रभाव, पद किंवा सत्ताधाऱ्यांशी असलेली जवळीक यावर कायद्याची अंमलबजावणी ठरू लागली तर लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वालाच तडा जातो. दुर्दैवाने, अशा घटना वारंवार घडताना दिसत आहेत. हे चित्र केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही; देशभरातही कायद्याच्या समान अंमलबजावणीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणाऱ्या घटना घडत आहेत. दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनाच्या वेळी पोलिसांच्या गणवेशात येऊन आंदोलक विद्यार्थ्यांना मारहाण करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला नाही, असा आरोप केला जातो. पॅलेट गनचा वापर करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली नाही. मात्र कायदा व सुव्यवस्था बिघडवल्याच्या आरोपाखाली आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस देशभर फिरत राहिले. पॅलेट गनच्या वापराच्या प्रकरणी देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सहा तास पोलीस ठाण्यासमोर आंदोलन करावे लागले. अशा अनेक घटनांमधून कायद्याची अंमलबजावणी निवडक पद्धतीने होत असल्याची भावना बळावते. विद्यानंद बापट यांच्या प्रकरणाचे उदाहरण घ्या. आवाजाच्या प्रदूषणा विरोधात भूमिका मांडल्यामुळे त्यांच्याविरोधात तक्रार झाली आणि यंत्रणा सक्रिय झाली. युट्युब वर पंडित यांच्या प्रकरणातही ज्यांचा प्रत्यक्ष संबंध नाही, अशा व्यक्तींच्या तक्रारीवरून यंत्रणा तत्परतेने हालचाल करते, अशी भावना निर्माण झाली. तक्रार आली की तिची चौकशी करणे आणि कायद्यानुसार कारवाई करणे यात गैर काहीच नाही. प्रश्न आहे तो सर्व प्रकरणांमध्ये हीच तत्परता दाखवली जाते का? ठाण्यात महापालिकेच्या दवाखान्यात जाऊन माजी नगरसेवकाने धांगडधिंगा घातल्याच्या प्रकरणात तर वेगळेच चित्र समोर आले. संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल करून अटक करण्यासाठी प्रशासनावर दबाव आणावा लागला. आंदोलन करावे लागले. म्हणजे सामान्य नागरिकाने कायद्याचा आधार मागायचा आणि प्रशासनाने कारवाई करावी यासाठी पुन्हा आंदोलन करायचे, अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर मग कायद्याच्या राज्याची संकल्पना नेमकी कुठे उरते? याच पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा सवाल अधिक गंभीर ठरतो. न्यायालयाला ‘कायद्याचे राज्य आहे की नाही?’ असे विचारण्याची वेळ राज्य शासनावर येणे ही कोणत्याही सरकारसाठी अभिमानाची बाब नाही. न्यायालये सरकारच्या कारभारात हस्तक्षेप करण्यासाठी नसतात; मात्र प्रशासन आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडण्यात कमी पडत असेल तर न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागतो. हा लोकशाहीतील धोक्याचा इशारा आहे. या प्रकरणानंतर शिवसेना शिंदे गटातील संबंधित कार्यकर्त्याची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली, हे राजकीयदृष्ट्या स्वागतार्ह पाऊल असले तरी ते पुरेसे नाही. पक्षांतर्गत कारवाई झाली म्हणून कायद्याचा प्रश्न संपत नाही. गुन्हा झाला असेल तर पोलिसांनी निष्पक्षपणे तपास करणे, पुरावे गोळा करणे आणि कायद्यानुसार कारवाई करणे आवश्यक आहे. राजकीय पक्षांची शिस्त आणि राज्याची कायदेशीर जबाबदारी या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. सत्ताधाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, कायदा हा विरोधकांना आवरण्यासाठी किंवा सामान्य नागरिकाला धाक दाखवण्यासाठीचे हत्यार नाही. तो सत्ताधाऱ्यांनाही तितकाच लागू असतो. लोकशाहीत सरकारची खरी ताकद विरोधकांवर किती कठोर कारवाई करता येते यात नसते; तर आपल्या माणसांवरही कायदा तितक्याच कठोरपणे लागू करता येतो का, यात असते. सर्वोच्च न्यायालयाची चपराक म्हणूनच एका व्यक्तीला किंवा एका प्रकरणाला उद्देशून पाहता कामा नये. ती संपूर्ण प्रशासनासाठी आरसा आहे. त्या आरशात दिसणारे चित्र बदलायचे असेल तर राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त, निष्पक्ष आणि समान कायदा अंमलात आणणारी यंत्रणा उभी करावी लागेल. कारण लोकशाहीत शेवटी प्रश्न एवढाच असतो; सत्ता मोठी की कायदा? संविधानाने या प्रश्नाचे उत्तर फार पूर्वीच दिले आहे. कायदा सर्वोच्च आहे. आता ते उत्तर प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे.**

# महाराष्ट्राच्या सुरक्षेचा संस्थात्मक ऱ्हास: उत्तरदायित्वाचे अपयश की राजकीय सोयीचे राजकारण?

प्रा.डॉ.प्रभाकर जाधव
धर्माबाद.

महाराष्ट्र हे देशाचे 'आर्थिक इंजिन' मानले जाते, मात्र गेल्या काही वर्षांतील गुन्हेगारीची आकडेवारी पाहता, राज्याच्या सुरक्षिततेच्या प्रतिमेला तडा गेल्याचे स्पष्ट दिसते आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो आणि राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या २०२५-२६ च्या एका ताज्या अहवालांचे विश्लेषण केल्यास असे लक्षात येते की, महाराष्ट्रातील गुन्हेगारी ही आता केवळ कायदा आणि सुव्यवस्थेची तात्पुरती समस्या उरलेली नाही. तर ती एक गंभीर 'संस्थात्मक संकट' बनली आहे. मात्र, या सर्व अराजकतेमध्ये राज्याचे आणि केंद्राचे गृह मंत्रालय नेमकी काय भूमिका बजावत आहे, हा कळीचा प्रश्न आता जनतेतून विचारला जात आहे.

भारतातील इतर प्रमुख राज्यांशी तुलना केली असता, महाराष्ट्राचे चित्र चिंताजनक वाटत आहे. एकूण दखलपात्र गुन्ह्यांच्या बाबतीत महाराष्ट्र आज देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०२५ च्या आकडेवारीनुसार, उत्तर प्रदेशमध्ये गुन्हेगारीचा दर प्रति लाख लोकसंख्येमागे कमी होत असताना दिसतो. तर हा दर महाराष्ट्रात प्रति लाख ४४५.९ इतका उच्चांकावर पोहोचला आहे. या आकडेवारीवरून येथे प्रश्न उपस्थित होतो की, उत्तर प्रदेशसारखे राज्य जर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्याचा दावा करू शकते, तर महाराष्ट्राच्या गृहखात्याला ते का जमू नये? राज्याचे गृहमंत्री केवळ राजकीय सभांमध्ये व्यस्त आहेत की गुन्हेगारांवर वचक बसवण्यात त्यांना रस उरलेला नाही?असा प्रश्न जन सामान्यांच्या मनात का उपस्थित होऊ नये..

एखाद्याने गुन्हा केलेला आहे आणि त्या गुन्ह्यावर शिक्षा होत असेल तर गुन्ह्याचे प्रमाण निश्चितच कमी होते. सध्या आपल्या राज्यात गुन्हे घडणे ही एकच समस्या नसून, गुन्हेगारांना मिळणारी शिक्षा हा खऱ्या प्रशासकीय सक्षमतेचा निकष असतो. येथेच महाराष्ट्राचे गृहखाते तोंडघशी पडल्याचे दिसते आहे. महाराष्ट्रात गुन्ह्यानुसार दोष सिद्ध झालेला दर पाहिला तर आपल्याच देशातील प्रगत राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र आजही पिछाडीवर आहे. केरळ आणि तामिळनाडू यांसारख्या राज्यांमध्ये गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण ७०% ते ८०% च्या दरम्यान आहे, तर महाराष्ट्रात हे प्रमाण जेमतेम ५०% ते ५५% पर्यंत अडकले आहे. याचा अर्थ, निम्म्याहून अधिक गुन्हेगार पुराव्याअभावी किंवा तपासातील त्रुटींमुळे मोकळे सुटत आहेत. त्याही पुढे जाऊन गुन्हेगारांमध्ये आणखी एक भावना निर्माण होत आहे ती म्हणजे काहीही केले तरी सुटू शकतो हा आत्मविश्वास गुन्हेगारांमध्ये निर्माण होणे, हे गृह मंत्रालयाचे सर्वात मोठे अपयश आहे.

सध्या देशासह महाराष्ट्रात सुद्धा महिलांच्या आणि मुलींच्या सुरक्षितेचा प्रश्न गंभीरतेने पुढे येतो आहे. महाराष्ट्र हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या महिलांना सुरक्षितता असलेली ओळख असलेले 'पुरोगामी महाराष्ट्र' असे आहे. असे असूनही महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत आज महाराष्ट्र देशात तिसऱ्या क्रमांकावर असून २ लाख ५० हजारांहून अधिक खटले प्रलंबित आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात महिला वरील होणारे खटले प्रलंबित असतील तर ही जबाबदारी आणि हा गंभीर प्रश्न सोडवण्याचे उत्तरदायित्व कोणाचे हा एक महत्त्वाचा प्रश्न पुढे येतो? येथे राज्याच्या आणि केंद्राच्या गृह मंत्रालयाची जबाबदारी नाही का? याबाबत सामान्यांच्या मनात प्रश्न निर्माण होतो आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकारने दिलेला 'निर्भया फंड' आणि इतर योजनांचा वापर महाराष्ट्रात नेमका कुठे झाला? राज्याराज्यांमधील गुन्हेगारी रोखण्यासाठी केंद्राने समन्वय साधणे अपेक्षित असताना, केवळ राजकीय संघर्षात आणि संस्थांचा गैर उपयोग करून आपल्या विरोधकांना 'आत येता का? आत जाता' यासाठीच गृहमंत्रालयाची शक्ती खर्ची



पडत असल्याचे चित्र दिसत आहे.

अलीकडे आम्ही सध्याच्या युगाला डिजिटल क्रांतीचे युग असे म्हणतो. या युगात सुद्धा अनेक गुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढताना दिसते आहे. एका आकडेवारीनुसार असे दाखवून दिले आहे की, डिजिटल क्रांतीच्या युगात महाराष्ट्र 'सायबर क्राईम'चे केंद्र बनले आहे. २०२४ ते २०२६ या दोन वर्षांच्या कालावधीत राज्यात सायबर फसवणुकीच्या माध्यमातून नागरिकांनी तब्बल ७,५९२ कोटी रुपये गमावले आहेत. सायबर गुन्हेगारीच्या बाबतीत महाराष्ट्र देशात अव्वल स्थानावर आहे. जर असे होत असेल तर येथे केंद्र आणि राज्य या दोघांच्याही गृहखात्यावर ताशेरे ओढणे आवश्यक आहे. उत्तर प्रदेश आणि तेलंगणासारखी राज्ये सायबर सुरक्षेसाठी स्वतंत्र 'कमांड सेंटर' उभारत असताना, महाराष्ट्रात मात्र सायबर तक्रारींचे एफआयआरमध्ये रूपांतर होण्याचे प्रमाण केवळ २% आहे. हे पोलिसांच्या तांत्रिक हतबलतेवर शिक्कामोर्तब करते. सायबर चोरट्यांनी वापरलेली ३३ लाखांहून अधिक बँक खाती आजही तपास यंत्रणांच्या रडारवर आहेत, मात्र मनुष्यबळा अभावी तपास संथ गतीने काम करते आहे. सायबर गुन्हे हे आंतरराज्यीय आणि आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असतात. अशावेळी केंद्राच्या गृहमंत्रालयाने राज्यांना दिलेली तांत्रिक मदत अपुरी का पडते? दुसरीकडे, राज्याच्या गृहखात्याने 'सायबर शिल्ड'च्या केवळ घोषणा करण्याऐवजी प्रत्यक्ष तपासासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ का उपलब्ध करून दिले नाही? हा सुद्धा एक महत्त्वाचा प्रश्न कायम उपस्थित होताना दिसतो आहे?

एकीकडे गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असताना दुसरीकडे पोलीस दलातील रिक्त पदे आणि कामाचा ताण अधिक वाढत चाललेला आहे असा हा गृहखात्याच्या उदासीनतेचा सर्वात मोठा पुरावा पुढे येतो आहे. महाराष्ट्र पोलीस दलात हजारो पदे रिक्त आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या मानकांनुसार प्रति १ लाख लोकांमागे २२२ पोलीस असणे आवश्यक आहे, परंतु महाराष्ट्रात हे प्रमाण १५० पेक्षाही कमी आहे. गुजरात आणि कर्नाटकसारख्या शेजारील राज्यांनी भरती प्रक्रियेत सातत्य राखले आहे. परंतु महाराष्ट्रात राजकीय अस्थैर्य आणि न्यायालयीन कचाट्यामुळे भरती प्रक्रिया रखडल्या आहेत. परिणामी, एका पोलिसाला दिवसाला सरासरी १४ ते १६ तास ड्युटी करावी लागते, ज्याचा परिणाम तपासाच्या गुणवत्तेवर आणि गुन्हेगारांवरील वचक कमी होण्यावर होतो. मग महाराष्ट्रातच भरती प्रक्रियेला राजकीय साठमारीचे ग्रहण का लागले आहे? राज्याचे गृहमंत्री म्हणून या रिक्त जागा भरण्याची जबाबदारी कोणाची? याकडेही लक्ष वेधता आले पाहिजे.

गुन्हेगारी का वाढत आहे वाढण्यासाठी जबाबदारी कोणाची असे प्रश्न जेव्हा पुढे येतात तेव्हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पोलीस सुधारणांचा अभाव आहे. असे बोलले जाते. सर्वोच्च न्यायालयाने २००६ मध्ये 'प्रकाश सिंह' खटल्यात पोलीस दलाला राजकीय जोखडातून मुक्त करण्यासाठी काही स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे दिली होती. यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी स्वायत्त 'पोलीस एस्टॅब्लिशमेंट बोर्ड' स्थापन करणे अनिवार्य होते. मात्र, महाराष्ट्रात हे बोर्ड आजही केवळ कागदावरच असून बदल्यांचा रिमोट कंट्रोल गृहमंत्र्यांच्या आणि राजकीय नेत्यांच्या हातात आहे. पोलिसांना 'लोकसेवक' बनवण्याऐवजी 'राजकीय एजंट' म्हणून वापरण्याची ही वृत्ती महाराष्ट्राच्या सुरक्षेला आणि गुन्हेगारीकरणाला सुरुंग लावत आहेत का? असा प्रश्न उपस्थित होताना दिसतो आहे.


महाराष्ट्राच्या गुन्हेगारीकरणात वाढ करणारी आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे अमली पदार्थाचा वाढता वावर हा राज्यापुढील सर्वात मोठा 'सायलेंट किलर' ठरत आहे. २०२४ मध्ये महाराष्ट्रात तब्बल ४,२४९ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. गृहमंत्री जेव्हा केवळ विरोधी पक्षांच्या नेत्यांवर कारवाई करण्यात व्यस्त असतात, तेव्हा ड्रग्ज माफियांचे अधिक फावते आहे. तसेच यावेळी गुन्हेगारीकरण वाढण्यास आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नियुक्त्यांमध्ये होणारा प्रचंड राजकीय हस्तक्षेप हा महाराष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी सर्वात मोठा धोका ठरला आहे. नेहमी असे घडत असल्यामुळे गुन्हेगारीकरणावर ज्या गोष्टींचा प्रभाव असतो तो म्हणजे 'खाकी'चा दरारा संपला असून आता ती केवळ एक 'सेटलमेंट'ची संस्कृती फोफावत चालली आहे.

महाराष्ट्रातील ही वाढती गुन्हेगारी केवळ सामाजिक समस्या नाही, तर ते केंद्र आणि राज्याच्या गृह मंत्रालयाचे संयुक्त अपयश आहे. जोपर्यंत गृहमंत्री आपल्या पदाची जबाबदारी केवळ राजकीय सत्ता टिकवण्यासाठी नाही, तर जनतेच्या सुरक्षिततेसाठी वापरत नाहीत, तोपर्यंत महाराष्ट्राचा हा 'सुरक्षेचा बुरुज' सावरणे कठीण आहे. प्रशासकीय बदल्यांचा खेळ आणि राजकीय कुरघोड्यांमध्ये महाराष्ट्राची 'खाकी' मलीन होत असताना, गृहमंत्रालयाने आत्मचिंतन करण्याची वेळ निघून तर गेली नाही ना? आता केवळ घोषणा नकोत, तर गृहमंत्र्यांनी जनतेला उत्तर द्यायला हवे की महाराष्ट्र पुन्हा कधी सुरक्षित होईल?

संदर्भ:
राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरो अहवाल २०२४-२५
महाराष्ट्र गुन्हे अन्वेषण विभाग आकडेवारी २०२५
सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचना (प्रकाश सिंह विरुद्ध भारत संघ)
सायबर गुन्हे आणि दोषसिद्धीच्या दराबाबत माहितीच्या अधिकारातून प्राप्त आकडेवारी

# अमली पदार्थांपासून दूर राहा; महिला सुरक्षा व वाहतूक नियमांबाबत सजग राहा

## पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन यांचे विद्यार्थ्यांना आवाहन



नांदेड/प्रतिनिधी-आजच्या डिजिटल युगात अमली पदार्थांचे सेवन, सोशल मीडियाचा अतिवापर आणि सायबर गुन्हे ही तरुणांसमोरील गंभीर आव्हाने आहेत. विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांपासून स्वतःला दूर ठेवतानाच आपल्या मित्रपरिवारालाही त्यापासून परावृत्त करावे. वाहन चालविताना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे आणि आपत्कालीन परिस्थितीत डायल ११२ या सेवेचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन नांदेडचे पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि स्वयंसिद्धा स्त्रीशक्ती उपक्रमाच्या संयुक्त विद्यमाने अमली पदार्थ प्रतिबंध, महिला सुरक्षा व वाहतूक नियम या विषयावर विद्यापीठाच्या सभागृहात विशेष जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष आणि झूमच्या माध्यमातून मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन उपस्थित होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक सुप्रिया केंद्रे, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर दा. पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. बाबासाहेब सुरवसे यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन यांनी प्रभावी पीपीटी सादरीकरणाद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अमली पदार्थांचे सेवन केवळ व्यक्तीचे आरोग्यच नव्हे, तर कुटुंब आणि संपूर्ण समाजाच्या भवितव्यावर परिणाम करते. तरुणाई ही देशाची सर्वात मोठी शक्ती असून तिच्या ऊर्जेचा सकारात्मक वापर होणे आवश्यक आहे. सोशल मीडियाचा अतिवापर, सायबर गुन्हे आणि डिजिटल माध्यमांमधून निर्माण होणाऱ्या विविध धोक्यांबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना सावध केले. रस्ते अपघात टाळण्यासाठी हेल्मेट व सीट बेल्टचा वापर, वेगावर नियंत्रण आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक सुप्रिया केंद्रे यांनी महिलांच्या संरक्षणासाठी असलेले विविध कायदे, उपलब्ध शासकीय यंत्रणा आणि सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महिलांनी आपल्या कायदेशीर अधिकारांची जाणीव ठेवाव. विद्यार्थ्यांनी जागरूक राहण्याबरोबरच आपल्या परिसरातही महिला सुरक्षा आणि कायदेविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांनी केले, तर स्वयंसिद्धाच्या समन्वयिका डॉ. नीना गोगटे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अंतर्गत तक्रार समितीच्या समन्वयिका डॉ. संगीता माकोने, स्त्री अभ्यास केंद्राच्या समन्वयिका डॉ. शालिनी कदम तसेच विद्यार्थी विकास कक्ष समितीचे सदस्य डॉ. योगिनी सातारकर, डॉ. बाबुराव जाधव, डॉ. राजकुमार मून, डॉ. नंदकुमार बोधगीरे आणि डॉ. रणजीत तेहरा यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भाजपच्या बीएलए पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा संपन्न

किनवट/प्रतिनिधी- किनवट विधानसभा मतदारसंघातील विशेष संक्षिप्त पुनरीक्षण प्रक्रियेच्या अनुषंगाने ३३१ बूथवरील बीएलए-दोन पदाधिकाऱ्यांची दुसऱ्या टप्प्यातील कार्यशाळा पार पडली. किनवट येथील संत गजानन महाराज संस्थानच्या सभामंडपात आयोजित केलेल्या कार्यशाळेत आ. भीमराव केराम यांच्या प्रमुख उपस्थिती होती.




किनवट विधानसभा मतदारसंघ भाजपाच्या वतीने आयोजित कार्यशाळे दरम्यान एसआयआर प्रक्रियेत बीएलए-दोन पदाधिकाऱ्यांची भूमिका, बूथनिहाय कामकाज आणि मतदार यादीच्या पुनरीक्षण प्रक्रियेबाबत घ्यावयाची काळजी याबाबत आ. केराम आणि अतुल मुंडलिक यांनी ओतप्रोत मार्गदर्शन केले. मतदार यादीतील नोंदी तपासणे, आवश्यक दुरुस्त्या, नवीन मतदारांची नोंदणी तसेच बूथस्तरावर समन्वयाने काम करण्याबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. या कार्यशाळेला राजेंद्र केशवे, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, शिवराज राघू मामा, व्यंकटराव नेम्मानिवार, कांतराव घोडेकर, प्रा.किशन मीरासे, भगवान हुरदुके, ज्ञानेश्वर दहिफळे, उमाकांत कऱ्हाळे, स्वागत आयेनेनिवार, बालाजी आलेवार, नीलकंठ मस्के, गोपू महामुने, सागर पिसारीवार, संतोष मरस्कोल्हे, रमेश बद्दीवार, सुकेशिनी कपाटे, पूनम दीक्षितांसह ३३१ बूथवरील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# कुणबी प्रमाणपत्रासाठी १० ते १७ सप्टेंबर दरम्यान विशेष शिबिर

मुखेड/प्रतिनिधी-मराठा कुणबी आणि कुणबी मराठा समाजातील पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी जिल्हाधिकारी नांदेड यांनी १० ते १७ सप्टेंबर या कालावधीमध्ये मुखेड तालुक्यातील सर्व महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष मोहिमेचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मुखेडचे तहसीलदार अभयराज नंजुंडे यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या सूचनेनुसार मुखेडचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर पात्र नागरिकांच्या जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रक्रियेला गती देण्यासाठी हे अभियान राबवले जात आहे. मुखेड तालुक्यातील १० सप्टेंबर रोजी मुखेड मंडळातील सर्व सज्जे व त्या अंतर्गतची गावे व जांब बु मंडळातील सर्व सज्जे त्या अंतर्गत ११ सप्टेंबर रोजी येवती मंडळातील सर्व सज्जे त्या अंतर्गतची गावे व अंबुलगा बु मंडळातील सर्व सज्जे व त्या अंतर्गत याची गावे १५ सप्टेंबरला मुक्रमाबाद मंडळातील सर्व सज्जे त्या अंतर्गतची गावे व बाहाळी मंडळातील सर्व सज्जे व त्या अंतर्गतची गावे १६ सप्टेंबर रोजी जाहूर मंडळातील सर्व सज्जे त्या अंतर्गतची गावे व चांडोळा मंडळातील सर्व सज्जे त्या अतर्गत्याची गावे हे सर्व महसूल मंडळाच्या मुख्यालयाचे ठिकाणी ही शिबिरे होणार आहेत.

# शिवसेना जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## दंगलकार चंदनशिवे यांचा विषमतावादी व्यवस्थेवर जोरदार प्रहार



किनवट/प्रतिनिधी- शिवसेनेचे (उबाठा) नांदेड जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांचा ७ सप्टेंबर रोजी किनवट येथील साईवंदना मंगल कार्यालयात वाढदिवसाच्या औचित्यावर अभिष्टचिंतन सोहळा विद्रोही कवी नितीन चंदनशिवे यांच्या वैशिष्टयपूर्ण ग्रामीण भाषाशैलीत देशातील विषमतावादी व्यवस्थेवर जोरदार फटकेबाजीने पार पडला.

जिल्हाप्रमुख खराटे व चंदनशिवे यांचे जिजामाता चौकात तालुका शिवसेना व युवासेनेने फटाक्यांची आतिषबाजी आणि चार जेसीबी मशीनद्वारे त्यांच्यावर पुष्पवृष्टी करून जंगी स्वागत केले. सत्काराला उत्तर देताना खराटे म्हणाले, विद्यार्थी दशेपासून हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रभावित होऊन शिवसेनेत निष्ठेने काम करत आलो. मागील २५ वर्षांत अनेक राजकीय-सामाजिक चढ-उतार पाहिले. शोषित, उपेक्षित आणि वंचितांसाठी संघर्ष करणे हाच शिवसेनेचा बाणा आहे. छातीवर गोळ्या झेलण्याची वेळ आली तरी शिवसेना सोडण्याचा विचार मनात आणला नाही. सत्ता असो वा नसो, आमचा संघर्ष सुरू राहील. दरम्यान विद्रोही कवी 'दंगलकार' नितीन चंदनशिवे यांनी 'आपला कांबळे लय हुशार' या काव्यातून शोषित-उपेक्षित घटकांनी जात-धर्म विसरून एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले.

या सोहळ्यास शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख दिलीप वेदपाठक, किनवटच्या नगराध्यक्ष सौ.सुजाता विनोद एंड्रलवार, अनिल रुणवाल, उमेश जाधव, मारोती दिवसे, जितू चोले, उपनगराध्यक्ष हसनलाला, जि.प.च्या माजी अध्यक्षा जनाबाई डुडुळे, श्रीमती बेबीताई नाईक, फिरोज दोसानी, करण एंड्रलवार, सौ.विमलताई ज्योतिबा खराटे, ॲड.अर्चित नाईक, नगरसेवक अभय महाजन, मारुती मुनेश्वर, ॲड.यश खराटे, नगरसेवक प्रवीण राठोड, रोहन एंड्रलवार, नंदिनीताई टारपे यांनी मनोगतातून दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक नगरसेवक प्रशांत कोरडे यांनी संचालन कांबळे यांनी तर आभार मोहन पांचाळ यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवासेना तालुकाप्रमुख अतुल दर्शनवाड, माजी शहरप्रमुख संतोष यलचलवार, प्रमोद जाधव, शुभम देवकते, संतोष तक्कलवार, भानू कोत्तूरवार, प्रवीण नाईकवाडे, चंद्रमणी कसबे, आनंद क्यतमवार राकेश गंनोजवार, शैलेश बेलसरवार आदींनी परिश्रम घेतले. आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अनेक नेत्यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने पक्षकार्यकर्ते आणि लोकांचा मेळ जमऊन शक्ती प्रदर्शन करण्यावर भर देत असल्याचे दिसून येते. अशा शक्ती प्रदर्शनामुळे आळसावलेले कार्यकर्ते मरगळावस्थेतून बाहेर पडून कामाला लागण्यासाठी मदत होते, हे विशेष म्हणता येईल.

# उस्मानशाही मिलच्या पुनरुज्जीवनासाठी २७ सप्टेंबर रोजी सर्वपक्षीय बैठक

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहराच्या औद्योगिक, आर्थिक आणि ऐतिहासिक विकासाशी निगडित असलेली निजामकालीन उस्मानशाही मिल पुन्हा सुरू करण्यासाठी व्यापक प्रयत्न करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. यासाठी रविवार, दि.२७ सप्टेंबर रोजी दु.१२ वा.जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे सर्वपक्षीय संयुक्त बैठक आयोजित करण्याचे बैठकीत ठरले.

नांदेड शहरात सन १९२० ते २००४ या प्रदीर्घ कालावधीत कार्यरत असलेली निजामकालीन उस्मानशाही मिल तसेच त्यानंतर केंद्र सरकार अर्थात भारत सरकारच्या मालकीची असलेली उस्मानशाही मिल (नांदेड टेक्सटाईल मिल) पुन्हा सुरू करण्यासाठी आता व्यापक स्तरावर प्रयत्न करण्याची भूमिका बैठकीत घेण्यात आली. उस्मानशाही मिल ही नांदेडच्या औद्योगिक इतिहासातील महत्त्वपूर्ण वारसा मानली जाते. मिल पुन्हा सुरू झाल्यास नांदेड शहरासह परिसरातील युवकांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. त्याचबरोबर शहराच्या औद्योगिक विकासालाही चालना मिळून आर्थिक उलाढालीला गती मिळू शकते, असे मत बैठकीत उपस्थितांनी व्यक्त केले.या पार्श्वभूमीवर उस्मानशाही मिल संवर्धन समिती, नांदेड जिल्हा या नवीन समितीला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. मिलच्या पुनरुज्जीवनासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यासह सर्व संबंधित घटकांना एकत्रित करून आंदोलनात्मक व प्रशासकीय पातळीवर प्रयत्न करण्याचा निर्धार करण्यात आला.मिल पुनरुज्जीवनाच्या मागणीला व्यापक राजकीय पाठबळ मिळावे, यासाठी नांदेड जिल्ह्यातील सर्व आजी-माजी खासदार, आमदार, विविध राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष तसेच प्रमुख पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे. माजी केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांताताई पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार असून, मिलच्या पुनरुज्जीवनासाठी पुढील दिशा निश्चित केली जाणार आहे. रविवार, दि.२७ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे होणाऱ्या या बैठकीत सर्वपक्षीय नेते व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून नांदेडच्या औद्योगिक भवितव्याबाबत एकत्रित भूमिका मांडावी, असे आवाहन करण्यात आले आहे.या बैठकीस समन्वयक तरनुम मोहम्मद, श्याम निलंगेकर, बळवंत मोरे, प्रांजली रावणगावकर, बाबाराव नरवाडे, यशवंत थोरात, प्रवीण जेठेवाड, बाबुराव साळवे आणि लक्ष्मण कापसे यांची उपस्थिती होती.

# वझरा (बु.) येथे ठक्करबाप्पा योजनेतील सिमेंट रस्ता वादाच्या भोवऱ्यात

## गुत्तेदारावर कारवाई न झाल्यास उपोषणाचा इशारा

किनवट/प्रतिनिधी-वझरा (बु.) येथील गोंडखेडी प्रभाग क्र.३ मधील आदिवासी वस्तीत ठक्करबाप्पा योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या १५ लाख रुपयांच्या सिमेंट रस्ता बांधकामात अनियमितता व निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा गंभीर आरोप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचासह सदस्यांनी केला आहे. याप्रकरणी गुणनियंत्रण कक्षाकडून सखोल चौकशी करून ठेकेदाराचे देयक रोखण्याची मागणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तक्रारदारांनी ८ सप्टेंबर रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात दिलेल्या तक्रारीनुसार, सन २०२५-२६ या वर्षात मंजूर झालेल्या या रस्त्यासाठी अंदाजपत्रकानुसार खोदकाम न करता, जुन्याच कच्च्या रस्त्यावर सीसीकरणाच्या कामावर मातीमिश्रीत नाल्यातील वाळू वापरून निष्कृष्ट दर्जाचे काम केले जात आहे. अंदाज पत्रकातील नोंदीनुसार दगड, गिट्टी, मुरूमांचे थरांवर थर देऊन पाणी टाकून रोलरने दबई केल्यास दर्जेदार काम होते परंतु तसे न करता हे काम उरकले जात असल्याने सरळ शासकीय निधीचा अपव्यय होत असल्याचा स्पष्ट आरोप करण्यात आला आहे.विशेष म्हणजे, संबंधित अभियंत्याने प्रत्यक्ष स्थळ पाहणी न करता घरबसल्या मोजमाप पुस्तिका तयार करून देयकास मान्यता दिल्याचा संशय व्यक्त केला आहे. तसेच, सन २०२४ ते २०२६ या काळात या कामाबाबत कोणतीही ग्रामसभा किंवा मासिक सभा झालेली नसून, १३ फेब्रुवारी २०२४ रोजीचा ठराव क्र.०८ हा बेकायदेशीर व बनावट दस्तऐवजांच्या आधारे तयार करण्यात आल्याचा आरोप या तक्रारदारांनी केला आहे.या संपूर्ण प्रकरणाची ८ दिवसात गुणनियंत्रण कक्षातर्फेचौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी. कामाची देयके तात्काळ रोखावीत, मागणी मान्य न झाल्यास लोकशाही मार्गाने बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. उपसरपंच जितेंद्र कचरु कांबळे, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश संभा धुर्वे, मनोहर बळीराम सिडाम, भागीरथा देवराव मेश्राम, सौ.मोनिका संदिप बादावार आणि सौ. रेणुका जितेंद्र कांबळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# धर्माबाद तालुक्यात दुष्काळ जाहीर करा;शेतकरी संघर्ष समितीचे तहसीलदारांना निवेदन

धर्माबाद/प्रतिनिधी-गेल्या एक महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने धर्माबाद तालुक्यातील खरीप पिके जळून खाक झाली आहेत. या पार्श्वभूमीवर, धर्माबाद तालुक्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी २ लाख रुपयांची मदत द्यावी, या मागणीसाठी 'जिल्हा शेतकरी जनआंदोलन संघर्ष समिती, नांदेड'च्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

समितीच्या प्रमुख मागण्या धर्माबाद तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून पिकांच्या नुकसानीपोटी प्रतिहेक्टर २ लाख रुपये देण्यात यावेत, दोन वर्षापासून प्रलंबित असलेला पीक विमा मधील प्रलंबित खरीप पीक विम्याचे पैसे त्वरित द्यावेत आणि यंदाच्या हंगामात ट्रिगर्सचा समावेश करून शंभर टक्के पीक विमा मंजूर करावा, आगामी रब्बी पेरणीसाठी शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर २५ हजार रुपयांची तात्काळ मदत मिळावी, पोचमपाड बॅक वाटर बाबत मुंबई मंत्रालयात तातडीने बैठक घ्यावी, बाभळी बंधाऱ्याचा थकीत मावेजा द्यावा व इतर मागण्यां संदर्भात शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी डॉ. भगवानराव मनूरकर, उबाठा शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख गणेश गिरी, नारायण पवार, व्यंकटराव जाधव, बालाजी सावळे आणि साईनाथ जाधव यांच्यासह इतर शेतकरी नेत्यांनी केली आहे.



## समतानगरात नाल्या तुंबल्या

नांदेड/प्रतिनिधी-सध्या पावसाळ्याचे दिवस असले तरी बदलत्या वातावरणाने कडाक्याचे ऊन सर्वत्र पहावयास मिळत आहे. यामुळे उन्हाळ्यासारखी अवस्था भरपावसाळ्यात अनुभवयास येत आहे. कोंदट वातावरणाने साथीचे आजार वाढत असल्याने रुग्णालयात अबालवृद्धांसह सामान्य नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. अशा स्थितीत समतानगर येथील नाल्या तुंबलेल्या असतांनाही याकडे मनपा प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे.


### CHANGE IN NAME

My (old name) is **SAJAYKUMAR BAHETI** which now I am, changing as (new name) **SAJAY KACHRULAL BAHETI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**SAJAY KACHRULAL BAHETI**

R/o 2-12-443, Flat no.4 Banda ghat road

Ashwini appartment Vazriabad Nanded-431601

Mob. No.7385172350



### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २५/०९/२०२५

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार हमीद जाफरखान पठाण रा.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा अजीज हमीद पठाण रा.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव अजीज हमीद पठाण सदर व्यक्तीचा मौ.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०८/०२/२००८ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २२/०९/२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- २५/०९/२०२५
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३२९/२०२६
(CNR No.MHND10-001120-2026)

अर्जदार -

१ प्रयागबाई भ्र.दादाराव मुंडे वय-८० वर्षे धंदा-घरकाम
२ महाजन पि.दादाराव मुंडे वय-५७ वर्षे धंदा-शेती
अर्जदार क्र.१ व २ रा.मुंडेवाडी ता.कंधार जि.नांदेड
३ मंडोदरी भ्र.भानुदास गित्ते वय-६० वर्षे धंदा-घरकाम
रा.वंजारवाडी ता.कंधार जि.नांदेड
४ प्रेमाबाई भ्र.तेजेराव केंद्रे वय-५५ वर्षे धंदा-घरकाम
रा.एकुरका खुर्द ता.जि.लातुर
५ दैवशाला भ्र.नागनाथ कागणे वय-४८ वर्षे धंदा-घरकाम
रा.कागणेवाडी ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ चे पती व २ ते ५ चे वडील नामे दादाराव ग्यानोबा मुंडे हे होते. त्यांचा दिनांक २९/०१/२०२४ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदाराचे म्हणणे आहे की दादाराव ग्यानोबा मुंडे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत दादाराव ग्यानोबा मुंडे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत दादाराव ग्यानोबा मुंडे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-०५/१०/२०२६

आज रोजी दि.०२/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार


# संत शिरोमणी महाराज यांची पुण्यतिथी साजरी



मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड येथील नाभिक समाजाच्या वतीने संत शिरोमणी महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देविदास गायकवाड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माधव कदम, कैलास गोडसे, नगरसेवक अविनाश चौदंते, संजय बोकेफोड यांच्यासह प्रतिष्ठित उपस्थित होते. यावेळी संत शिरोमणी महाराज यांच्या प्रतिमेची पूजा करून त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे भाषण करण्यात आले. संत शिरोमणी महाराज यांच्या नावाने शहरात सभागृह बांधण्याची विनंती नगराध्यक्षाकडे करण्यात आली. नाभिक समाज संघटनेच्या वतीने राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्याचा सत्कार करण्यात आला. अध्यक्ष उत्तम हनुमंते उपाध्यक्ष अब्दुल रज्जाक, साहेबराव गागलवाड यांच्यासह सर्व पत्रकार सर्व पत्रकार संघटनेचा सत्कार करण्यात आला. यावेळी नाभिक संघटनेचे गंगाधर कुंचटवार, संतोष गायकवाड, बाबुराव गायकवाड, माधव कोंडा मंगल, बालाजी शहापुरे, साईनाथ जामलवाड, गजानन मुखडी, अनिल गायकवाड यांच्यासह नाभिक समाजाचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २५/०९/२०२५

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार हमीद जाफरखान पठाण रा.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा इरम हमीद पठाण रा.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव इरम हमीद पठाण सदर व्यक्तीचा मौ.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक १६/०८/२०१० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २२/०९/२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- २५/०९/२०२५
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २५/०९/२०२५

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार खाजा हमीद पठाण रा.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा खाजा हमीद पठाण रा.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव खाजा हमीद पठाण सदर व्यक्तीचा मौ.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक १७/०७/२००५ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २२/०९/२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- २५/०९/२०२५
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २५/०९/२०२५

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार हमीद जाफरखान पठाण रा.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा हमीद जाफरखान पठाण रा.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव हमीद जाफरखान पठाण सदर व्यक्तीचा मौ.भंडारकुमठ्याचीवाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक १०/०३/१९८३ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २२/०९/२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- २५/०९/२०२५
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

# बहाद्दरपुरा पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत टोल स्थगित करा

## फुलवळ येथील टोल नाक्यावर काँग्रेसचे आंदोलन



कंधार/प्रतिनिधी-राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० वरील फुलवळ (ता. कंधार) येथील पथकर नाका बंद करून टोलवसुली थांबवावी, तसेच बहाद्दरपुरा येथील पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत टोलवसुली स्थगित करावी, अशी मागणी कँधार तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली. या मागणीसाठी फुलवळ टोल नाक्यावर काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आंदोलन करून निदर्शने केली.

कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय ईश्वरराव भोसीकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी, कंधार यांचे प्रतिनिधी तसेच फुलवळ पथकर नाक्याच्या व्यवस्थापकांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. बहाद्दरपुरा येथील पुलाचे काम अनेक वर्षांपासून रखडले असून अद्यापही ते पूर्ण झालेले नाही. दुसरीकडे फुलवळ येथील राष्ट्रीय महामार्गावर टोलवसुली सुरू आहे. महामार्गाची अनेक ठिकाणी दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यातच बहाद्दरपुरा पूल वाहतुकीसाठी बंद असल्याने वाहनचालकांना सुमारे १२ किलोमीटरचा अतिरिक्त वळसा घ्यावा लागत आहे. त्यामुळे वेळ आणि इंधनाचा खर्च वाढून वाहनधारकांवर आर्थिक भुर्दंड पडत असल्याचे काँग्रेसने निवेदनात म्हटले आहे. पूल अपूर्ण, रस्ता खराब आणि तरीही टोलवसुली सुरू ठेवणे अन्यायकारक आहे. बहाद्दरपुरा पुलाचे काम पूर्ण न करता नागरिकांकडून टोलवसुली करणे म्हणजे जनतेवर अतिरिक्त आर्थिक भार टाकणे असल्याचा आरोप काँग्रेसने केला. त्यामुळे पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत फुलवळ येथील पथकर नाका बंद करून टोलवसुली तातडीने स्थगित करावी, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान, आंदोलनामुळे पथकर नाक्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी आंदोलनकर्त्यांनी पथकर नाका व रस्ता वाहतुकीसाठी खुला केला. मात्र, मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास भविष्यात काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन करून टोल नाका बंद करण्याचा इशारा संजय भोसीकर यांनी दिला. यावेळी कंधार शहर काँग्रेसचे अध्यक्ष सय्यद सलीम सय्यद रहीम, जिल्हा उपाध्यक्ष विश्वंभर पाटील मसलगेकर, बसवेश्वर मंगनाळे, माधवराव गित्ते, रामभाऊ देवकांबळे, सुरेश कल्लाळीकर, सचिन बसवंते, शिवम पाटील कुरूळेकर, सरपंच शंकर डिगोळे, नवनाथ बनसोडे, अविनाश आंबटवाड आलेगावकर, प्रभाकर व्यवहारे, मोहन पाटील वडजे, मनोहर पाटील चांडोळकर, शिवा पाटील बोरगावे, अशोक कदम शेकापुरकर, विवेक चिवडे, संदीप कल्याणकस्तुरे, मुन्ना बसवंते, पवन पटणे, बालाजी दासरे, हरिदास बसवंते, मारोती गव्हाणे, राहुल पाटील पेठकर, रोहित खरात यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणवेश योजनेचा निधीच अनवाणी; विद्यार्थ्यांच्या अंगावर दुसरा गणवेश कधी?

माहूर/प्रतिनिधी-राज्य शासनाने यंदापासून मोफत गणवेश योजनेच्या अंमलबजावणीसाठी नवीन निकष लागू केले. मात्र या निकषांपेक्षा निधी वितरणाची यंत्रणाच विद्यार्थ्यांच्या गणवेशाच्या आडवी आली आहे. प्रति विद्यार्थी दोन गणवेशांसाठी ६०० रुपयांचा निधी अपेक्षित असताना प्रत्यक्षात एका गणवेशासाठी केवळ २४० रुपयांप्रमाणे निधी मंजूर होऊन अद्याप निधी मिळालेला नाही त्या मुळे पहिल्या गणवेशाचे देयकच रखडले आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होऊन पावणे तीन महिने उलटले तरी दुसऱ्या गणवेशाचा निधी मिळालेला नसल्याने मराठवाडा मुक्ती संग्राम दिन तोंडावर असताना विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश द्यायचा तरी कसा? असा संतप्त सवाल शिक्षकांसमोर उभा ठाकला आहे.

केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अभियान आणि राज्य शासनाच्या माध्यमातून इयत्ता पहिली ते आठवीतील पात्र मुली, अनुसूचित जाती-जमातीतील मुले तसेच दारिद्र्यरेषेखालील पालकांच्या मुलांना मोफत गणवेशाचा लाभ दिला जातो. विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण असताना, प्रत्यक्षात मात्र निधीच वेळेवर उपलब्ध होत नसल्याने या योजनेचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. यंदा दोन गणवेशांसाठी प्रतिविद्यार्थी ६०० रुपयांचा निधी अपेक्षित आहे. मात्र, सध्या एका गणवेशासाठी केवळ २४० रुपयांप्रमाणे निधी मिळाला असून तोही अपुरा ठरत आहे. दु गणवेशाची पूर्ण रक्कम अद्याप प्राप्त झालेली नाही. त्यामुळे शाळा प्रशासनासमोर गणवेश खरेदी, वितरण आणि देयक अदा करण्याचा मोठा पेच निर्माण झाला आहे. गणवेशासोबत विद्यार्थ्यांना एक जोड बूट आणि एक जोड मोजे देण्यासाठी प्रतिविद्यार्थी १७० रुपयांची तरतूद जाहीर करण्यात आली आहे. मात्र, गणवेशाचा निधीच अपुरा असताना बूट-मोज्यांसाठी मंजूर निधी अद्याप शाळांपर्यंत पोहोचलेला नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः पावसाळ्यात शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांकडे पुरेसे पादत्राणे नसल्याने काहींना तुटक्या चपलांवर समाधान मानावे लागत आहे. शासनाच्या कागदावरील घोषणा आणि शाळेच्या प्रत्यक्ष परिस्थितीत मोठी तफावत निर्माण झाली आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा या शेतकरी, शेतमजूर आणि हातावर पोट असलेल्या कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा प्रमुख आधार आहेत. या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, बूट-



मोजे अशा मूलभूत सुविधा देण्याच्या योजना शासन राबवते. मात्र निधी वेळेत न मिळाल्यास या योजनांचा नेमका लाभ विद्यार्थ्यांना कधी मिळणार, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. शाळा सुरू होऊन पावणे तीन महिने उलटले, तरी दुसरा गणवेश नाही. बूट-मोजे नाहीत आणि निधीची प्रतीक्षा कायम! त्यामुळे पालकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना गणवेशात उपस्थित राहण्याची वेळ जवळ आली असताना शासनाने तातडीने दुसऱ्या गणवेशाचा तसेच बूट-मोज्यांचा संपूर्ण निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शिक्षक व पालकांकडून होत आहे. घोषणा कागदावर आणि निधी खात्यातअशा कारभारामुळे विद्यार्थ्यांच्या हक्काच्या योजनेलाच विलंबाचा फटका बसत असल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे.

# अण्णाभाऊंच्या साहित्यात मार्क्सवाद-संविधानवादाचा संगम-डॉ.बी.एस.वाघमारे

नांदेड/प्रतिनिधी- साहित्य-सम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यामध्ये मानवतावाद, अन्यायाविरुद्धचा संघर्ष आणि समतामूलक समाजनिर्मितीची मूल्ये दिसून येतात. अण्णाभाऊ साठे हे मार्क्सवाद आणि संविधानवादाचे सुरेख मिश्रण होते, असे प्रतिपादन जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली येथील सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. बी. एस. वाघमारे यांनी केले.


यशवंत महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेत अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीची समीक्षा या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमास डॉ. कविता सोनकांबळे, डॉ. हरिश्चंद्र पतंगे, डॉ. साईनाथ शाहू, डॉ. हनुमंतलू तमलुरकर आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊंच्या लेखनातून प्रेरणा घेऊन लेखन करावे. तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे हस्तलेखनाची सवय कमी होत असून त्याचा बौद्धिक विकासावर परिणाम होत आहे. अण्णाभाऊंनी लेखणीच्या माध्यमातून क्रांतीचे विचार जनमानसात रुजविले, असे डॉ. वाघमारे यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ. कविता सोनकांबळे यांनी अण्णाभाऊंनी उपेक्षित व दुर्लक्षित स्त्रीला आपल्या साहित्याच्या केंद्रस्थानी आणल्याचे सांगितले. श्रमिकांच्या श्रमाला प्रतिष्ठा आणि अंधश्रद्धेविरोधात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याचे काम त्यांच्या साहित्याने केले, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मोहिनी लिंगायत यांनी केले. परिचय कु. समीक्षा वाघमारे यांनी करून दिला, तर आभार डॉ. साईनाथ शाहू यांनी मानले. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नरसी येथे भाजप महिला मोर्चाची संघटनात्मक बैठक उत्साहात

नायगाव/प्रतिनिधी-भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा तथा माजी आमदार सौ. चित्राताई वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली महिला संघटन अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने नांदेड दक्षिण ग्रामीणची संघटनात्मक बैठक नरसी येथे उत्साहात पार पडली.

सौ. प्रणिताई चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीचे आयोजन भाजप महिला मोर्चाच्या नांदेड जिल्हाध्यक्षा अनिताताई चोंडीकर यांच्या वतीने करण्यात आले होते. विविध घटकांतील महिलांना संघटित करून महिला सक्षमीकरणाला चालना देणे, तसेच महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी संघटनात्मक पातळीवर काम करण्याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.बैठकीस सौ. रूपाताई ठाकूर, सौ. महादेवीताई मठपती, सौ. वर्षाताई बंडाळे, सौ. मीराताई संगनोर, कु. श्रुती तुडमे, भावना दाशेटवार, सौ. अंजली दाचावार, पुष्पलता मुंडकर, उमाताई पवार, पल्लवीताई वडजे, विद्या अग्रवाल, जयश्री देवणे, कु प्रिया जोशी यांच्यासह महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# कादंबरीकार बाबू बिरादार यांच्या नावाने पुरस्कार देण्याबाबत बैठक संपन्न



देगलूर/प्रतिनिधी-ज्येष्ठ कादंबरीकार तथा साहित्यिक बाबू बिरादार यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव व्हावा आणि त्यांच्या साहित्यिक कार्याची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने त्यांच्या नावाने साहित्य क्षेत्रातील पुरस्कार देण्याबाबत देगलूर येथे महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. कवी लक्ष्मण मलगिरवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पुरस्काराच्या स्वरूपासह विविध बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस ज्येष्ठ बालसाहित्यिक शं. ल. नाईक, शिवसेना नांदेड जिल्हा उपप्रमुख व्यंकटराव पाटील खतगावकर, हणमंत बाबू बिरादार, डॉ. मिलिंद शिकारे, नागोराव उतकर, माधव देशमुख, प्रा. सुभाष हिवराळे, माजी सरपंच मनोहर देगावकर, संपादक प्रकाशक पांडुरंग निवृत्तीराव पुठ्ठेवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बाबू बिरादार यांच्या साहित्यिक कार्याचा आणि त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी त्यांच्या नावाने पुरस्कार सुरू करण्याबाबत उपस्थितांनी सकारात्मक भूमिका मांडली. मराठी साहित्य क्षेत्रात आपल्या लेखनातून वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ कादंबरीकार बाबू बिरादार यांच्या साहित्यिक कार्याची दखल घेत, त्यांच्या नावाने पुरस्कार देणे ही त्यांच्या साहित्यसेवेला अभिवादन करणारी बाब ठरेल, अशी भावना बैठकीत व्यक्त करण्यात आली. साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या साहित्यिकांचा गौरव या माध्यमातून करण्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला.

# स्वातंत्र्य अमृत निबंध स्पर्धेत अॅड.डॉ.प्रकाश जोशी तृतीय

सगरोळी/प्रतिनिधी- सेवा सहकार फाउंडेशनतर्फे आयोजित स्वातंत्र्य अमृत ऑनलाइन निबंध स्पर्धा-२०२६चा निकाल जाहीर झाला असून,



५५ वर्षांवरील वयोगटात सगरोळी, ता. बिलोली येथील ड. डॉ. प्रकाश चं. जोशी यांनी तृतीय क्रमांक पटकावला आहे.

स्वातंत्र्याचा उत्सव, संकल्प, कर्तव्य, समाजसेवा आणि राष्ट्रनिर्माण या संकल्पनेवर आधारित या स्पर्धेला विविध वयोगटांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १ ते १५ ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेचा उद्देश समाजात सचोटी, चारित्र्य, विश्वास आणि सेवाभाव यांसारख्या मूल्यांची जपणूक करण्याचा होता. ५५ वर्षांवरील गटात प्रज्ञा रत्नाकर मराठे (डोंबिवली) यांनी प्रथम, प्रमोद मधुकर कुलकर्णी (ठाणे) यांनी द्वितीय, तर ड. डॉ. प्रकाश चं. जोशी यांनी तृतीय क्रमांक मिळविला. या गटातील विजेत्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. ड. डॉ. प्रकाश जोशी यांच्या या यशाबद्दल सगरोळी तसेच नांदेड जिल्ह्यातील विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.



(छाया : विनोद महाबळे,लोहा)

शेतकऱ्यांचा बैल पोळा सणानिमित्त लोहा येथील आठवडी बाजारात सर्जा-राजाला सजविण्यासाठी लागणारे साहित्य विक्रीसाठी उपलब्ध झाले असून शेतकरी बांधव साहित्य खरेदी करीत आहेत.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष एम.आर.कायस्थ सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.१३४७/२०२६

अर्जदार : १. सविता भ्र.माधव मुळे वय ४५ वर्ष धंदा घरकाम, २. ज्ञानेश्वर पि.माधव मुळे वय २३ वर्ष धंदा खाजगी व्यवसाय, ३. साक्षी उर्फ भाग्यश्री पि.माधव मुळे वय २१ वर्ष धंदा घरकाम, ४. कौशल्याबाई भ्र.बालाजी मुळे वय ७५ वर्ष धंदा घरकाम रा.सर्व तरोडा बु.नांदेड ता.जि.नांदेड

विरुद्ध
निरंक

दावा : बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट १८२७ च्या कलम २ व ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे. ज्याअर्थी अर्जदार मयत माधव पि.बालाजी मुळे यांचे वारस आहेत. मयत माधव पि.बालाजी मुळे यांचा मृत्यू दिनांक ०६/०३/२०२६ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक २८/१०/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०९/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
४ थे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

# सायन्स कॉलेज नांदेड व शिवा ग्लोबल अॅग्रो इंडस्ट्रीजमध्ये सामंजस्य करार



नांदेड/प्रतिनिधी-राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव व व्यावसायिक कौशल्ये मिळावीत, या उद्देशाने सायन्स कॉलेज, नांदेड आणि शिवा ग्लोबल अॅग्रो इंडस्ट्रीज यांच्यात विद्यार्थ्यांच्या ऑन द जॉब ट्रेनिंग (ओजेटी) साठी सामंजस्य करार करण्यात आला.या करारामुळे विद्यार्थ्यांना उद्योगातील कार्यपद्धती, आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादन प्रक्रिया तसेच प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. शिक्षण आणि उद्योगक्षेत्र यांच्यातील दुवा अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.यावेळी शिवा ग्लोबल अॅग्रो इंडस्ट्रीज चे संचालक श्री. मधुसूदन कलंत्री, सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे, रसायनशास्त्र, विश्लेषणात्मक रसायनशास्त्र, अॅग्रोकेमिकल्स अँड फर्टिलायझर्स विभागाचे प्रमुख डॉ.डी.आर.मुंडे, श्री. चंद्रशेखर अय्यर आणि श्री. कार्तिक जाधव उपस्थित होते.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षण, कौशल्यविकास आणि रोजगारक्षमतेला चालना मिळणार असून, उद्योग-अकादमिक सहकार्याचा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे.

## पावसाचा शिडकावा

नांदेड/प्रतिनिधी-गेल्या महिन्याभरापासून पावसाने अचानक पाठ फिरविल्याने बळीराजा संकटात सापडला आहे. जेमतेम पावसावर उभारी धरलेली पिके आता मात्र माना टाकत असल्याचे चित्र सर्वत्र पहावयास मिळत आहे. अशा स्थितीत आज मात्र गच्च भरुन आलेले आभार जणू काही मोठ्या पावसाचीच चाहुल असल्याचे दिसत होते. त्यात केवळ हलक्या पावसाचा शिडकावा झाला. आणि नंतर संपुर्ण आकाश मोकळे झाल्याने उकाडा मात्र उन्हाळ्यासारखा जाणवायला सुरुवात झाली आहे.

# पुंडलिक जटाळकर यांचे निधन

धर्माबाद/प्रतिनिधी- सार्वजनिक बांधकाम विभाग धर्माबाद येथे शासकीय पदावर कार्यरत असलेले पुंडलिक दामाजी जटाळकर यांचे



आज (बुधवार) दि.९ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

धर्माबाद येथील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते गणेश जटाळकर यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. गुरुवार दि.१० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता धर्माबाद येथील रामनगर स्मशानभूमीत पुंडलिक दामाजी जटाळकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# आम्रपाली साळवे यांना पीएच.डी.पदवी

नांदेड/प्रतिनिधी-एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील साहाय्यक प्राध्यापिका डॉ. आम्रपाली किशनराव साळवे यांना संगणक शास्त्र व अभियांत्रिकी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ. साळवे यांनी श्री गुरू गोविंद सिंहजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शिक्षण संस्थेत गुरुवर्य डॉ. कल्पना पी. पैठाणे (जोंधळे) यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले. एमआरआय प्रतिमांचा वापर करून मानवी मेंदूतील ट्यूमरचे विभाजन व शोध घेण्यासाठी प्रभावी तंत्रांची रचना हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. स्वारातीम प्र. कुलगुरू अशोक महाजन यांनी त्यांना पीएचडीचे प्रमाणपत्र बहाल केले.डॉ. साळवे या २००८ पासून एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांनी दोन पेटंट प्रकाशित केले असून, चार आंतरराष्ट्रीय एससीआय/स्कोपस जर्नल्स आणि चार आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन निबंध प्रसिद्ध केले आहेत. त्यांच्या यशाबद्दल एमजीएम ट्रस्टचे अध्यक्ष कमलकिशोर कदम व संचालिका डॉ. गीता एस. लाठकर यांनी अभिनंदन केले.



हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४